भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४९४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०७/२०१७

१) एटीएम कार्ड दाखवा तुम्हाला पैसे काढुन देतो असे म्हणुन कोडवर्ड माहीत करुन पैसे काढुन इसमाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद .:-

दिनांक ०८/०५/२०१७ चे १२.०० ते ०५/०७/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादी विजय मारोती तरोणे वय ५५ वर्ष, रा. महालगाव हा स्टेट बॅक येथे एटीएम कार्ड घेवुन पैसे काढण्यास गेला असता एटीएम मधुन पैसे न निघाल्याने फिर्यादीचे मागे ऊभा असलेला आरोपी अनोळखी इसम वय अंदाजे ५० ते ५५ वर्ष, वयोगटातील यांनी तुमचा एटीएम कार्ड दाखवा तुम्हाला पैसे काढुन देतो म्हणुन फिर्यादीने आपला एटीएम कार्ड दिला तेव्हा त्याने ७००/रु. काढुन दिले व त्या इसमाने कोड वर्ड माहीत करुन घेवुन आपले जवळील एटीएम कार्ड फिर्यादीस देवुन व फिर्यादीचा कार्ड आपले कडे ठेवुन व दिनांक ०६/०५/२०१७ पासुन ते ०५/०७/२०१७ पर्यत एटीएम मधुन आरोपीने आता पर्यत २१,९५९/-रु. काढुन फसवणुक केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४२० भांदवि. सहकलम ६६ आयटी अॅक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. वर्मा पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

२) शेतातील तणसीचे ढिग जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक ०५/०७/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील फिर्यादी बालचंद बबन ढोरे वय २३ वर्ष, रा. विहीरगाव हा जेवन करुन हात धुण्याकरीता घराचे पाठीमागे निघाले असता त्याचे शेतातील तणसीचा ढिग जळतांनी दिसल्याने फिर्यादी व त्याचा भाऊ तणसीच्या ढिगाकडे जावुन पाहीले असता यातील आरोपी हा त्या तणसीच्या ढिगाजवळुन येतांनी दिसला व त्यानीच फिर्यादीचे शेतातील तणसीचा ढिग जाळुन अंदाजे ५,०००/-रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४३५ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास नापोशी. शेडे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

३) क्षुल्लक कारणावरुन तोंडा तोंडी भांडण करुन बासाची काठीने हाताला व पाठीवर मारुन हात फॅक्चर केल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक २०/०६/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील फिर्यादी जखमी नरेश देवीदास राऊत वय २६ वर्ष, रा. विरलीखुर्द हा आपले घराचे स्लॅपचे काम करीत असतांना यातील आरोपीने फिर्यादीस तुझ्या घराचे सर्वीस वायर माझे तणसीचे ढिगावर पाहीजे नाही असे बोलुन तोंडा तोंडी भांडण करुन तणसीच्या ढिगाजवळील बासाची काठी आणुन फिर्यादीचे डावे हाताला व पाठीवर मारले त्यामुळे डावे हात फॅक्चर झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी एक्सरे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२५ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास नापोशी. घागी पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

४) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे धडक देवुन इसमाचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :-

दिनांक ६/०७/२०१७ चे ०२.३० वा. दर. यातील अनोळखी मृतक वय ३० ते ३५ वयोगटातील ज्युपीटर गाडी क्र. एमएच ४० एआय ८६९६ च्या चालकास कोणीतरी अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन धडक मारुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. धांडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**५) सबमरसीबल पंप व सर्वीस वायर, टिनाचे पत्रे चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०५/०७/२०१७ चे रात्र. दर. यातील फिर्यादी संदीप रतीराम लोथे वय ३२ वर्ष, रा. एकोडी याने आपली नवीन घराचे बांधकाम करीत घराचे मागील भागात बोरवेलमध्ये लावण्यात आलेली सीआरआय कंपनीची १ एचपी सबमरसीबल पंप व सर्वीस वायर टिनाचे पत्रे एकुण १०,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिधीमेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**६) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक ०६/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, मोहाडी, तुमसर व आंधळगाव येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४३ लिटर हातभट्टी दारु + १ मोटार सायकल किंमती ३४,३००/–रु. व ०२ लिटर १६० मि.ली. देशी दारु किमती. ६२४/रु. असा एकुण किमती ३४,९२४ /रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एम.एम. सिडाम)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.